Teachingninja.in

Latest Govt Job updates

Private Job updates

Free Mock tests available

Visit - teachingninja.in

# MAHATET
# 2014 Paper-II
## Previous Year Paper
### (Mar. Med.)

Teachingninja.in

# महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (TET) पेपर II

परीक्षा दिनांक : १४ डिसेंबर २०१४

वेळ – २.५ तास (१५० मिनीटे) गुण – १५०

## भाग - A : इंग्रजी

**Read the following conversation between the person indicated. Then complete blanks given in the reported speech each by choosing from the options given below: [Question Nos.1 and 2]**

Pooja : Hello, can I speak to Garima ?

Snehal : I'm afraid, she's not at home. May I know who is speaking ?

Pooja : I'm Pooja. I think you are Snehal. Please tell your mother that I will meet her at 5 pm sharp at Coffee House.

Snehal : O.K. auntie. I'll tell her.

**1.** Pooja asked over telephone ______.
1. if I can speak to Garima.
2. if I may speak to Garima
3. if I could speak to Garima.
4. if she could speak to Garima.

**2.** Snehal replied that her mother was not at home and wanted to know ______.
1. who is speaking
2. if I know who was he/she
3. who was speaking
4. if she might know who is he/she

**3.** Choose the one which best expresses the meaning of the given word : *'Nauseate'*

1. Tempt 2. Sicken
3. Despise 4. Detest

**4.** Choose the word nearly 'Opposite' in meaning to the underlined word in the sentence:
*"Sudhir used to <u>disparage</u> his neighbour every now and then."*

1. denigrate 2. belittle
3. praise 4. criticize

**5.** Choose the one which best expresses the meaning of the underlined idiom :
*"Piu had to look <u>high and low</u> before she could find her scooter key."*

1. nowhere 2. always
3. everywhere 4. somewhere

**6.** Which one of the following pairs is not correctly matched as 'one-word substitution' for the given phrase?
1. A person who betrays a friend - Traitor
2. A sea abounding in islands - Archipelago
3. Contempt of God - Blasphemy
4. A house for storing grains - Godown

**Read the following poem and answer by selecting the most appropriate alternative: [Question Nos. 7 to 9]**

He wrought at one great work for years;
The world passed by with lofty look;
Sometimes his eyes were dashed with tears;
Sometimes his lips with laughter shook.
His wife and child went clothed in rags,
And in a windy garret starved;
He trod his measure on the flags,
And high on heaven his music carved.
Wistful he grew but never feared;
For always on the midnight skies
His rich orchestral score appeared
In stars and zones and galaxies.
He thought to copy down his score;
The moonlight was his lamp; he said,
'Listen my love', but on the floor
His wife and child were lying dead.

**7.** People passed by him with pride but never ______.

1. talked to him 2. discouraged him
3. praised him 4. helped him

**8.** He looked upto the sky for ______.
1. the inspiration of his music
2. its blue colour
3. the glitter of the stars
4. treasure

**9.** He completed his masterpiece but ______.
1. achieved failure
2. lost his family
3. could not pay a heavy price
4. did not enjoy personal glory

**10.** Find out which part of the sentence has an error :
*My observation is that/between Vinayak and Santosh,/Vinayak is the most intelligent/No error.*
(A / B / C / D)

1. A 2. B
3. C 4. D

**In the given dialogue there are blanks, each of them has been numbered. The suitable expression has been mentioned against the number, choose the most suitable alternative to fill in the blank : [Q.Nos.11 to 13]**

Teachingninja.in

Student : Sir, I feel out of sorts now. _11_ ?
Teacher : What's the problem ?
Student : Actually _12_ and I think there may be food-poisoning. I feel like vomiting!
Teacher : Don't worry _13_ the peon to take you home.

**11.** 1. Please allow me
2. Can I go out
3. Will you please allow me
4. May I leave early

**12.** 1. I am feeling strange
2. there is serious problem
3. I have some stomach problem
4. Some trouble is in the stomach

**13.** 1. Where is the peon 2. I'm asking
3. You may go to 4. Someone call

**14.** Choose the most correct alternative :
(A) My house's roof is leaking.
(B) The roof of my house is leaking.
(C) My house is out of repairs.
1. Only (A) is correct
2. Only (B) is correct
3. Both (A) and (B) are correct
4. Both (B) and (C) are correct

**15.** Pick out the most effective word to fill in the blanks to make the sentence meaning fully complete :
"*The unruly behaviour of the students ______ their teacher.*"
1. tempered 2. clashed
3. aggrieved 4. incensed

**16.** Choose the most appropriate alternative to fill in the blank :
"*The teacher ordered Kamal to leave the room and ______ him to return.*"
1. stopped 2. refused
3. forbade 4. challenged

**17.** Choose the correctly spelt word :
1. Sinchronize 2. Synchronize
3. Synchromize 4. Syncronize

**18.** Choose the most appropriate alternative :
"*He neglects atternding ______ church, though ______ church is only few yards from his house.*"
1. no article, the 2. the, the
3. the, no article 4. a, the

**19.** Choose the appropriate alternative :
"*A man of honour adheres _____ his convictions even if others jeer _____ him.*"
1. upon, by 2. with, on
3. at, at 4. to, at

**20.** Choose the appropriate alternative to fill in the blank: "*Who ______ such a behaviour by ?*"
1. you were taught 2. you being taught
3. were you taught 4. were you been taught

**In the following passage, there are blanks, each of them has been numbered. The appropriate alternative has been mentioned against the number. Choose the correct alternative to fill in the blanks :**
**[Question Nos. 21 and 22]**

Interviews are very important for all of us. We must face interviews with confidence. There is _21_ any person who at one time or the other has not faced an interview situation. While interviews are a day to day experience for people who _22_ with others in their daily chores.

**21.** 1. perhaps 2. hardly
3. probably 4. possibly

**22.** 1. interact 2. respond
3. react 4. concern

**23.** Pranesh is afraid of marriage. His family thinks that he is suffering from ______.
1. genophobia 2. geraphobia
3. gynaephobia 4. gamophobia

**24.** Name the 'Figure of Speech' in the following line :
"*Failures are the pillars of success.*"
1. Paradox 2. Hyperbole
3. Oxymoron 4. Euphemism

**25.** Choose the one which best expresses the same sentence in 'Passive Voice':
"*Jack offered me a seat.*"
1. I was offered a seat by Jack.
2. I am offered a seat by Jack.
3. I had been offered a seat by Jack
4. I was been offered a seat by Jack.

**26.** Choose the most correct alternative showing indirect narration for the given 'Direct Speech' :
Mother said to me, "Don't run in the sun."
(A) Mother advised me not to run in the sun.
(B) Mother forbade me to run in the sun.
(C) Mother advised me do not run in the sun.
1. Only (A) is correct
2. Only (B) is correct
3. Both (A) and (B) are correct
4. Only (C) is correct

**27.** Fill in the blank by choosing the correct alternative:
"*_____ the resistance offered by him, the police arrested him.*"
1. Concerning 2. Viewing
3. Notwithstanding 4. Regarding

Teachingninja.in

28. Choose the correct alternative to fill in the blank :
"*The gold mined in India is _____ the gold mined in Africa.*"
1. superior than 2. more superior than
3. more superior to 4. superior to

29. Choose the most suitable alternative to make the sentence meaningfully complete :
"*If I knew his address _______.*"
1. I would have given it to you
2. I would have give it to you.
3. I would give it to you.
4. I will give it to you.

30. Choose which one of the following is correct :
1. A summon has been served on him.
2. A summons have been served on him.
3. A summons has been served on him.
4. Summons have been served on him.

**भाग A : मराठी**

31. पुढील शब्दांमधून अनेकवचनी शब्द ओळखा :
1. शब्द 2. निरोप
3. मार्ग 4. वाटा

32. पुढील जोड्यांमधून स्त्रीलिंग – पुल्लिंगाची चुकीची जोडी ओळखा :
1. गाडी – गाडा 2. मादा – मादी
3. वृक्ष–लता 4. कोल्हा – कोल्ही

33. कोणत्या विभक्तीला प्रत्यय नसतात ?
1. प्रथमा 2. द्वितीया
3. पंचमी 4. संबोधन

34. "तो साधू या देवळातच मुक्कामास असतो." या वाक्याचा काळ ओळखा :
1. साधा वर्तमानकाळ 2. पूर्ण वर्तमानकाळ
3. रीती भविष्यकाळ 4. रीती वर्तमानकाळ

35. तृतीय पुरुषी, एकवचनी, नपुंसकलिंगी असे स्वतंत्र क्रियापद असणारा प्रयोग कोणता ?
1. सकर्मक कर्तरी 2. भावे
3. अकर्मक कर्तरी 4. कर्मणी

36. पुढील वाक्यांमधून विध्यर्थी वाक्य ओळखा :
1. मनःपूर्वक दिलेल्या निमंत्रणाला मान द्यावा
2. काल आला होतात ना तुम्ही
3. ऊठ, लवकर तयार हो
4. काय कमालीचे आढेवेढे घेतात लोक

37. "ही न्यूनता सुखाची, चित्ता सदा विदारी,
स्वामी तिन्ही जगाचा, आईविना भिकारी"
या काव्यपंक्तीतील रस ओळखा :
1. अद्भुत 2. शांत
3. करूण 4. शृंगार

38. "पिवळे तांबुस ऊन कोवळें पसरे चौफेर
ओठा नेई सोने, वाटे, वाहुनिया दूर"
या काव्यपंक्तीत कोणता अलंकार आढळतो ?
1. अतिशयोक्ती 2. उत्प्रेक्षा
3. रूपक 4. उपमा

39. 'आयजीच्या जिवावर बायजी उदार' या म्हणीच्याच अर्थाची म्हण ओळखा :
1. पै दक्षिणा लक्ष प्रदक्षिणा
2. उंदराला मांजर साक्षी
3. काखेत कळसा गावाला वळसा
4. हलवायच्या घरावर तुळशीपत्र

40. 'हळद लागणे' या वाक्प्रचाराच्याच अर्थाचा वाक्प्रचार ओळखा :
1. दोनाचे चार हात होणे 2. बोभाटा होणे
3. मनात मांडे खाणे 4. हायसे वाटणे

41. पुढील शब्दांमधून मराठी उपसर्ग ओळखा :
1. गैर 2. प्र
3. पड 4. अप

42. पुढील शब्दांपैकी कोणता शब्द प्रत्ययघटित आहे ?
1. सरहद्द 2. संगीत
3. निगर्वी 4. तुलना

43. 'अंबर' शब्दाचा समानार्थी शब्द ओळखा :
1. रव 2. सिंधू
3. अनिल 4. हेम

44. 'आमंत्रित' या शब्दाचा विरूद्धार्थी शब्द ओळखा :
1. निमंत्रित 2. आगंतुक
3. सुमंत्रित 4. अनावृत

45. चुकीच्या प्रकाराने केलेले सामान्य रूप ओळखा :
1. दरवाजा – दरवाजा 2. माळ – माळे
3. भूल – भुली 4. मूल – मुली

46. 'दृग्गोचर' या संधीचा योग्य विग्रह ओळखा :
1. दृ + गोचर 2. दृग + गोचर
3. दृक् + गोचर 4. दृग + ओचर

47. अव्ययीभाव समासाचे उदाहरण ओळखा :
1. गैरशिस्त 2. वदनचंद्र
3. नर्मदा 4. वाडेहुडे

Teachingninja.in

**48.** पुढील शब्दांमधून दर्शक सर्वनाम ओळखा :

1. मी
2. तुम्ही
3. स्वतः
4. हा

**49.** पुढील शब्दांमधून विशेषण नसलेला शब्द ओळखा :

1. दुखरा
2. किरकिरी
3. आवाका
4. आजारी

**50.** पुढीलपैकी कोणता शब्द क्रियापद नाही ?

1. सालवाले
2. दुखावले
3. वळवला
4. बसवले

**51.** पुढील क्रियापदांमधून प्रयोजक क्रियापद ओळखा :

1. निजला
2. बोलावते
3. गेला
4. देववीन

**52.** पुढील शब्दांमधून लेखननियमांनुसार अचूक शब्द ओळखा :

1. ऋणानुंबध
2. रूणानूबंध
3. ऋणानुबंध
4. ऋणानूबंध

**53.** पुढील कादंबऱ्यामधून रंगनाथ पठारे यांच्या कादंबरीचे नाव ओळखा :

1. झुंजारमाची
2. पानिपत
3. तुंबाडचे खोत
4. ताम्रपट

**54.** 'आहे मनोहर तरी' हे कोणत्या प्रकारचे पुस्तक आहे ?

1. कवितासंग्रह
2. आत्मकथन
3. प्रवासवर्णन
4. कादंबरी

**55.** गटात न बसणारे नाव ओळखा :

1. चिनी माती
2. इजिप्तायन
3. अमेरिका
4. ग्रीकांजली

**56.** 'रक्तपुष्प' ही प्रसिद्ध एकांकिका कोणी लिहिली आहे ?

1. महेश एलकुंचवार
2. विजय तेंडुलकर
3. दिलीप परदेशी
4. रत्नाकर

**57.** उत्तम कांबळे यांनी कोठे झालेल्या साहित्यसंमेलनाचे अध्यक्षपद भूषविले ?

1. पुणे
2. ठाणे
3. चिपळूण
4. चंद्रपूर

**पुढील उतारा वाचून त्यापुढील प्रश्नांची उत्तरे लिहा : (प्रश्न-क्रमांक 58 ते 60 )**

आईवडिलांचे मुलांवर प्रेम असते. त्यांना त्यांची खूप काळजी वाटते. त्यांना मुलांचा अपेक्षाभंग झालेला, त्यांना दुःख झालेले, त्यांनी निराश झालेले पाहवत नाही. त्यांच्या बाबतीतले सर्व निर्णय आपणच अधिक योग्य रीत्या घेऊ शकतो, असे वाटल्यामुळेच ते मुलांबाबत विशिष्ट प्रकारे वागतात. मुलांनी कोणते शिक्षण घ्यावे, कोणाशी लग्न करावे, किती मुले होऊ द्यावीत याबाबतही त्यांचे आग्रही सल्ले असतात. परंतु यामुळे निर्णय घ्यायला, त्या निर्णयाला जबाबदार रहायला मुले शिकत नाहीत. त्यांना स्वातंत्र्य पेलता येत नाही. पाश्चात्य आईबाप मुलांशी या प्रकारे वागत नाहीत. 'हाताची घडी, तोंडावर बोट' हा आपल्या संस्कारांचा पाया, तर 'जा, पहा, करा, आपल्या निर्णयाची जबाबदारी घ्या-' हा त्यांच्या संस्कारांचा मूलमंत्र, पौर्वात्य संस्कार सगळे चुकीचे आणि पाश्चिमात्य संस्कार सगळे चांगले, असे मला मुळीच म्हणायचे नाही. परंतु जबाबदारी घ्यायला शिकण्याचे, स्वतंत्र पेलायला शिकण्याचे संस्कार मात्र आपण जरूर त्यांच्याकडून घ्यायला हवेत. मुलांना स्वतःच्या भावना ओळखायला, त्यांना नावे द्यायला आणि त्या व्यक्त करायला प्रोत्साहन दिले पाहिजे. मुख्य म्हणजे त्यांना चुका करण्याचे स्वातंत्र्य दिले पाहिजे आणि अयशस्वी होण्याची मुभाही!

**58.** भारतीय आईबाप मुलांना कसे बनवतात ?

1. स्वतंत्र
2. परावलंबी
3. हट्टी
4. स्वैर

**59.** आईबापांनी कोणते वैशिष्ट्य आत्मसात करायला हवे, असे लेखिका शेवटी सांगते ?

1. दुराग्रह
2. दुर्लक्ष
3. औदार्य
4. अनाग्रहीपणा

**60.** लेखिकेचा विचार कसा आहे ?

1. चुकीचा
2. पूर्वग्रहदूषित
3. पाश्चात्यधार्जिणा
4. समतोल

## भाग - B बालमानसशास्त्र व अध्यापनशास्त्र

**61.** कारक विकासामध्ये गुटेरिजने सांगितलेल्या खालीलपैकी कोणत्या बाबीचा समावेश होत नाही ?

1. कारक विकासाच्या संबोधात व्यक्तिभिन्नता दिसून येते.
2. शैशवावस्थेत व बालकावस्थेत कारक क्रियांचा विकास विशिष्ट क्रमाने होतो.
3. कौमार्यावस्था प्राप्त होईपर्यंत मुलामुलींच्या कारक विकासात खूपच फरक दिसून येतो.
4. प्राथमिक शाळेतील मुलांचा कारक विकास प्रामुख्याने शारीरिक विकासातील पक्वता आणि सराव यावर अवलंबून असतो.

**62.** शारीरिक विकासाबाबत खालीलपैकी कोणती बाब लागू पडत नाही ?

1. विकास हा परिमाणात्मक असतो.
2. विकास क्रमबद्ध असतो.
3. प्रत्येक व्यक्तिचा विकासाचा वेग भिन्न असतो.
4. विकासातील बदल सुधारणात्मक असतात.

Teachingninja.in

63. जेव्हा साधना चेतकाचे वर्गीकरण करावयाला शिकते व संवाद साधण्याच्या दृष्टीने विचार करू लागते तेव्हा जीन पियाजेच्या मते या अवस्थेस .......... म्हणतात.
1. मूर्त क्रियाकाल अवस्था
2. शब्दपूर्व अवस्था
3. बौद्धिक विकासाची अवस्था
4. क्रियापूर्व प्रतिनिधित्वाचा काळ

64. खालीलपैकी कोणते विधान बालोद्यान पध्दती व मॉंटेसरी पध्दती यामधील फरक दर्शवते ?
1. बालोद्यान पध्दतीत ज्ञानेंद्रिय शिक्षणावर भर दिला जातो.
2. मॉंटेसरी पध्दतीत $2^{1/2}$ ते 6 वयोगट शिक्षणाच्या दृष्टीने महत्वाचा आहे.
3. बालोद्यान पद्धतीत शैक्षणिक साधनांवर भर दिला आहे.
4. मॉंटेसरी पध्दतीत वैयक्तिक शिक्षण व कृतीवर भर दिला आहे.

65. स्वयंशोधन पध्दतीबद्दल खालीलपैकी कोणते विधान अयोग्य आहे ?
1. ही पध्दती बालमानसशास्त्रीय अध्ययन तत्त्वे पडताळण्यासाठी पूरक आहे.
2. ही पध्दती कार्यकारणभाव शोधण्यासाठी उपयुक्त आहे.
3. या पध्दतीत विद्यार्थीसंख्या मर्यादित हवी.
4. सर्व घटकासाठी ही पध्दत सुयोग्य आहे.

66. खालीलपैकी बुद्धिमत्तेविषयी असलेल्या घटकांपैकी अयोग्य घटक कोणता ?
1. नवीन परिस्थितीशी समायोजन साधण्याची क्षमता
2. परिस्थितीनुरूप बदल करण्याचे कौशल्य
3. नवीन गोष्टीचे अध्ययन करण्याची अक्षमता
4. पुर्वानुभवाची योग्य उपयोग करून घेण्याची क्षमता

67. गिलफोर्डच्या बुद्धिमत्तेच्या उपपत्तीनुसार बुद्धिमत्तेच्या 120 घटकांचे वर्गीकरण खालीलपैकी कोणत्या तीन गटात केले आहे ?
1. बोध, स्मरण, मूल्यमापन 2. क्रिया, आशय, निर्मिती
3. विचार, आशय, बोध 4. स्मरण, निर्मिती, बोध

68. मनश्चक्षुंवर प्रतिमा निर्मिती होण्यासाठी खालीलपैकी कोणती बाब लागू नाही ?
1. पूर्वी अनुभव घेतलेला असावा.
2. एका प्रतिमेचा अनुभव अधिक तीव्रतेने येण्याऐवजी बहुतेकांना मिश्र प्रतिमांचा अनुभव येतो.
3. प्रतिमेची तीव्रता एखादी बाब किती वारंवार अनुभवाला आली यावर अवलंबून असते.
4. एखाद्याच्या मनात सर्व प्रकारच्या प्रतिमा सारख्याच तीव्रतेने निर्माण होतात.

69. मूलभूत तत्त्वांचा आणि परिस्थितींचा आधार सोडता येत नाही, अशा वैज्ञानिक किंवा स्थापत्य शास्त्राच्या कल्पना म्हणजे ........ होय.
1. व्यावहारिक कल्पना 2. सौंदर्यनिष्ठ कल्पना
3. पुनरूत्पादक कल्पना 4. अनिर्बंध कल्पना

70. विद्यार्थ्यांच्या विचारशक्तिंचा व तर्कशक्तिंचा विकास होण्यासाठी शिक्षकांनी काय टाळावे ?
1 शिक्षकांनी आपली मते विद्यार्थ्यांवर लादू नये.
2. मुलांना मते मांडण्याची मुभा द्यावी.
3. सर्व मतांचा चिकित्सक विचार करण्यास शिकवावे.
4. मनावर भावना व पूर्वग्रहाचा पगडा ठेवून विचार करावा.

71. कंठस्थ ग्रंथीतून पाझरणाऱ्या अंतस्रावाचे प्रमाण कमी झाल्यास.........
1. उंची वाढते 2. बौद्धिक विकास खुंटतो
3. वजन कमी होते 4. शारीरिक वाढ चांगली होते

72. अभ्यासक्रम तयार करतांना व्यक्तिभेद लक्षात घेणे अत्यंत महत्वाचे असते. अशावेळी पुढीलपैकी कोणती बाब टाळावी ?
1. विद्यार्थ्यांची आवड, कला व क्षमतानुसार अध्ययन करण्याची सोय अभ्यासक्रमात असावी.
2. अभ्यासक्रम रचनेत मूलभूत विषय, चित्रकला, संगीत, शारीरिक शिक्षण या सारख्या विषयांचा समावेश असावा.
3. अभ्यासक्रम साचेबंद असावा.
4. काही विषय अनिवार्य तर काही विषय ऐच्छिक असावेत.

73. सचिनच्या वर्गशिक्षिकेला सचिनचे मूल्यमापन करायचे आहे. मूल्यमापन प्रक्रियेत खालीलपैकी कोणत्या गोष्टींचा समावेश करणे योग्य आहे ?
(अ) सचिनच्या वर्तनात किती बदल झाला ?
(ब) शिक्षकांची अध्यापन पध्दती कितपत उपयुक्त होती ?
(क) अध्यापनाचे उद्दिष्ट किती प्रमाणात साध्य होते ?
(ड) शैक्षणिक अनुभवांचे संयोजन झाले का ?
1. फक्त (अ) आणि (क)
2. (अ), (ब), (क), (ड) सर्व
3. फक्त (अ), (ब), (ड)
4. फक्त (अ), (ब), (क)

74. मूल्यनिर्धारणाच्या भूमिकेबाबत काही विधाने खाली दिली आहेत. त्यापैकी योग्य विधान कोणते ?
1. पुरावा जमा करून त्याचे अर्थ लावणे म्हणजे मूल्यमापन.
2. निर्णय प्रक्रियेत मूल्यनिर्धारणाला खूप महत्व असते.
3. गरजा लक्षात घेऊन त्या पूर्ण करण्यासाठी मूल्यनिर्धारण आवश्यक आहे.
4. वरील सर्व

Teachingninja.in

75. खालीलपैकी कोणते विधान हे सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाचे उद्दिष्ट नाही ?
1. बाह्य परीक्षेला पूरक साधन होणे.
2. शिक्षकांना स्वयंरोजगारास मदत करणे.
3. विद्यार्थ्यांमध्ये व्यक्तिमत्व विकासाविषयी चांगल्या सवयी लावणे.
4. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक निदान करणे.

76. अंध विद्यार्थ्यांना अध्यापन करताना विशेष शिक्षण देणाऱ्या शिक्षकाने पुढीलपैकी कोणत्या तत्त्वाचा वापर करावा
(अ) अमूर्तता (ब) एकात्म अनुदेशन
(क) अधिकची चेतना (ड) स्व कृती
1. (अ), (ब), आणि (क)
2. (ब), (क) आणि (ड)
3. (अ), (क) आणि (ड)
4. (अ), (ब), (क), (ड), सर्व

77. खालीलपैकी कोणता गट अध्यायन प्रतिमानांच्या मूलभूत घटकांचा गट आहे ?
1. उद्देशबिंदू, संरचना, सामाजिक प्रणाली, सहाय्यभूत प्रणाली
2. संरचना, पध्दती, उद्देशबिंदू, सामाजिक प्रणाली
3. उद्देशबिंदू, संरचना, पध्दती, सहाय्यभूत प्रणाली
4. उद्देशबिंदू, संरचना, पध्दती, आधुनिक अध्यापन

78. खाली दिलेल्या वैशिष्ट्यांपैकी विशेष गरजा असणाऱ्या मुलांचे कोणते वैशिष्ट्य नाही ?
1. या मुलांचे शैक्षणिक कार्यक्रम सर्वसामान्य मुलांच्या कार्यक्रमापेक्षा भिन्न असतात.
2. या मुलांच्या गरजा सर्वसामान्य मुलांपेक्षा वेगळ्या असतात.
3. या मुलांचे वर्तन प्रसामान्य असते.
4. या मुलांची शारीरिक वैशिष्ट्ये सर्वसामान्य मुलांपेक्षा वेगळी असतात.

79. रमेशला हार्मोनियम वाजवता येते म्हणून तो व्हायोलिन वाजवायला लवकर शिकला तसेच रीनाला बॅडमिंटन येत असल्यामुळे ती टेनिस खेळण्यास लवकर शिकली. या उदाहरणांवरून शिक्षण संक्रमणाच्या कोणत्या उपपत्तीचा बोध होतो ?
1. आदर्शवादी उपपत्ती 2. पूर्णाकारवादी उपपत्ती
3. समान घटकांची उपपत्ती 4. सामान्यीकरणाची उपपत्ती

80. खाली दिलेल्या अध्ययन दोषांचे प्रकार व त्याचे वर्णन यांच्यापैकी अयोग्य जोड्या कोणता ?

| गट 'अ' | | गट 'ब' |
|---|---|---|
| (अ) डिसलेक्सिया | - | लेखनात दोष |
| (ब) डिसग्राफिया | - | वाचनात दोष |
| (क) डिसकॅल्क्युलिया | - | गणिती दोष |

1. (अ) आणि (ब) 2. (ब) आणि (क)
3. (अ) आणि (क) 4. (अ), (ब), (क), सर्व

81. फ्लॅंडर्सच्या आंतरक्रिया विश्लेषण प्रणालीबद्दल खाली विधाने दिली आहेत. त्यापैकी अयोग्य विधान कोणते?
1. ही प्रणाली शिक्षकाच्या शाब्दिक वर्तनप्रकाराचे निरीक्षण करण्यास मदत करते.
2. या प्रणालीमध्ये एक ते सात गट शिक्षकाच्या वर्तनाशी संबंधित आहे.
3. या प्रणालीमध्ये आठ ते नऊ हे गट विद्यार्थ्यांच्या वर्तनाशी संबंधित आहे.
4. या प्रणालीत दहावा गट मुख्याध्यापकाच्या वर्तनाशी संबंधित आहे.

82. मंद विद्यार्थ्यांची आकलन शक्ती कमी असते म्हणून पुढीलपैकी कोणती बाब टाळावी ?
1. या विद्यार्थ्यांना इतर विद्यार्थ्यांपासून वेगळे न करता अध्यापन करावे.
2. त्यांना शिकविलेले मुद्दे घटवून घ्यावेत.
3. वर्गपाठ, गृहपाठ त्यांना झेपतील असेच द्यावेत.
4. त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करून चांगले छंद जोपासण्यास प्रोत्साहन द्यावे.

83. शिक्षक आपल्या व्यक्तिमत्वाचा ठसा अध्ययनार्थ्यांवर उमटवू शकतो असे सूचित करणारी हर्बार्ट यांची उपपत्ती ही अध्यापन उपपत्तींच्या ........ या प्रकारात मोडते.
1. सर्वसामान्य अध्ययन उपपत्ती
2. वर्णनात्मक अध्ययन उपपत्ती
3. औपचारिक अध्ययन उपपत्ती
4. पारस्पारिक पृच्छा अध्ययन उपपत्ती

84. अध्ययन अकार्यक्षम असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या भाषिक विकासात पुढीलपैकी कोणती बाब दिसून येत नाही?
1. इतर विद्यार्थ्यांच्या तुलनेत मुले भाषेत खूप मागे असतात.
2. ऐकलेले शब्द किंवा वाक्ये जशीच्या तशी म्हणता येतात.
3. एखाद्या घटनेचे, प्रसंगाचे वर्णन करता येत नाही.
4. मुले भाषेतील वाक्यरचना समजून घेण्यात मागे पडतात.

85. खाली दिलेल्या गरजांपैकी सहवासविषयक गरज कोणती ?
1. ऐंद्रिय समाधान 2. सत्ता
3. समाजमान्यता 4. स्थैर्य

86. अवधान नियंत्रित करणाऱ्यां बाबींमध्ये बाह्य घटक कोणता ?
1. तात्कालिक गरज 2. आवर्तने
3. सवय 4. वृत्ती

87. खालीलपैकी कोणते प्रेरणेचे वैशिष्ट्य नाही ?
1. मानवी वर्तनाला दिशा देण्याचे सामर्थ्य प्रेरणेत असते.
2. वर्तन पूर्ण होईपर्यंत प्रेरणा कार्यरत असते.
3. प्रेरणेमुळे विशिष्ट गोष्टींची निवड होते.
4. प्रेरणेमुळे शारीरिक व मानसिक असमतोल साधला जातो.

Teachingninja.in

88. कोणतीही संवेदना निर्माण होण्यासाठी कोणकोणत्या बाबींची गरज असते ?
(अ) उद्दिपक (ब) ज्ञानेंद्रिय (क) मज्जासंस्था
1. (अ) आणि (ब) 2. (ब) आणि (क)
3. (अ) आणि (क) 4. (अ), (ब), (क), सर्व

89. प्रकाशात अंतर्भूत असलेल्या सात रंगाचे स्मरण रहाण्यासाठी प्रत्येक रंगाचे आद्याक्षर घेऊन ता, ना, पि, ही नि, पा, जा असे सूत्र संस्करणातील अध्ययनाच्या कोणत्या पद्धतीवर आधारित आहे?
1. समध्यंतर पद्धत 2. स्मृतीसहायक पध्दत
3. समग्र पध्दत 4. उच्चारण पध्दत

90. चित्तभ्रम या अवबोधातील दोषाच्या बाबतीत पुढीलपैकी कोणती बाब अयोग्य आहे ?
1. चित्तभ्रमात उद्दिपक समोर नसताना भास होत असतो.
2. मनाच्या विशिष्ट प्रकारच्या अवस्थेमुळे चित्तभ्रम होतात.
3. चित्तभ्रमात संवेदनांचा चुकीचा अर्थ लावला जातो.
4. मनाची अतिसंवेदनशील अवस्था हे चित्तभ्रमाचे कारण होय.

## भाग - C : गणित व विज्ञान

91. 201 फूट लांबी व 87 फूट रूंदी असलेल्या सभागृहाच्या तळाला जास्तीत जास्त लांबीच्या बाजू असलेल्या चौरसाकृती टाईल्स किती लागतील?
1) 17487 2) 7772
3) 1943 4) 5829

92. मुंबईवरून निघालेल्या 'रातराणी' या बसमध्ये क्षमते ऐवढे प्रवासी बसलेले आहेत. A थांब्यावर $\frac{1}{3}$ प्रवाशी बसमधून उतरले व 30 प्रवाशी बसमध्ये चढले. B या थांब्यावर $\frac{1}{4}$ प्रवाशी बसमधून उतरले व 12 प्रवाशी बसमध्ये चढले. शेवटचा थांबा C वर सर्व 72 प्रवाशी उतरले, तर त्या बसची जास्तीत जास्त किती प्रवाशी वाहून नेण्याची क्षमता होती ?
1) 75 2) 60
3) 65 4) 120

93. विद्युत कंपनीने विद्युत दर शेकडा 20 ने वाढविला. दुसऱ्या वर्षी पुन्हा शेकडा 15 ने भाव वाढविला. हा वाढीवदर एकदाच वाढवायचा झाल्यास विजेचा दर शेकडा कितीने वाढवावा लागेल?
1) 35% 2) 5%
3) 38% 4) 17.5%

94. जर m = 0.1039 तर $3m+\sqrt{1+4m^2-4m}$ ची किंमत काढा :
1) 0.1039 2) 1.1039
3) 2.1039 4) 3.1039

95. $3\frac{268}{2197}$ चे घनमुळ काढा :
1) $\sqrt{3}\frac{4}{13}$ 2) $\sqrt{3}\frac{7}{13}$
3) $1\frac{6}{13}$ 4) $6\frac{1}{13}$

96. जर $3^{x-2}+3^{x+2}=19926$, तर x ची किंमत काढा :
1) 9 2) 7
3) 11 4) 5


97. एका काटकोन त्रिकोणाच्या बाजू x, x + 1 आणि x - 1 असतील, तर त्याचात कर्ण काढा :
1) 5 2) 4
3) $x^2$ 4) $4x^2$

98. 30 मी. लांबीची जाळी वापरून अविनाशला आपल्या घराजवळ 100 चौमी. क्षेत्रफळाची आयताकृती बाग तयार करायची आहे. तिच्या तीनही बाजूला जाळीचे कुंपण असून एक बाजू घराची भिंत आहे, तर बागेची रूंदी किती असेल ?
1) 15 मी. 2) 5 मी.
3) 10 मी. 4) 3 मी.

99. एका वर्तुळात PQ व RS या दोन समांतर जीवा वर्तुळ केंद्राच्या विरूध्द अंगास आहेत. जर PQ=6 सेमी. व RS=8 सेमी. असून त्या दोन जीवांमधील अंतर 7 सेमी. असेल, तर वर्तुळाची त्रिज्या काढा :
1) 3.5 सेमी. 2) 7 सेमी.
3) 5 सेमी. 4) 4 सेमी.

100. A नी B ला एक बॅग शेकडा 30 नफ्याने विकली. तीच बॅग B नी C ला शेकडा 20 तोट्यात विकली. ती बॅग C नी 832 रूपयात विकत घेतली, तर A नी खरेदी केलेल्या बॅगची खरेदी किंमत किती ?
1) रू. 832 2) रू. 850
3) रू. 760 4) रू. 800

101. खालील आकृतीत, रेख AB ही 14 सेमी. त्रिज्येचा वर्तुळाची जीवा आहे. Δ APB मध्ये, ∠APB=90° PA=PB व AB=$6\sqrt{2}$ सेमी., तर PAQRBP या कडेला असलेल्या मार्गाची लांबी किती ?




1) 88 सेमी. 2) 78 सेमी.
3) 144 सेमी. 4) 132 सेमी.

102. एका परीक्षेत 80 विद्यार्थ्यांना सरासरी 50 गुण आहेत. त्या परीक्षेत पास झालेल्या विद्यार्थ्यांना सरासरी 58 गुण आहेत व नापास विद्यार्थ्यांना सरासरी 18 गुण आहेत, तर त्या परीक्षेत नापास असलेल्या विद्यार्थ्यांची संख्या किती ?
1) 40 2) 64
3) 16 4) 18

Teachingninja.in

**103**. एक व्यक्ती आपल्या मासिक उत्पन्नाच्या $\frac{2}{5}$ भाग जेवणावर, $\frac{3}{10}$ भाग घरभाड्यावर, रू. 2,000 इतर बाबीवर खर्च करून उत्पन्नाच्या $\frac{7}{40}$ भाग बचत करतो, तर ती व्यक्ती जेवणावर व घरभाड्यावर एकूण किती खर्च करते ?

1) रू. 6,400 2) रू. 11,200
3) रू. 16,000 4) रू. 4,800


**104**. जर $x = 5.3\bar{7}+2.1\bar{7}+17.8\bar{9}-8.3\bar{2}$ तर x ची किंमत किती ?

1) $17.1\bar{5}$ 2) $17.1\bar{4}$
3) $17.1\bar{2}$ 4) $17.1\bar{3}$

**105**. जर 2y - 3 ने $8y^3 + ky^2 - 2y + 17$ ला भागले असता बाकी 68 उरते, तर k ची किंमत किती ?

1) 12 2) 10
3) 36 4) 18

**106**. आकृतीत, 'O' केंद्र असलेल्या वर्तुळात $m\angle PAO=32°$, $m\angle PBO=47°$, तर $\angle AOB$ चे माप शोधा :





1) 79° 2) 158°
3) 168° 4) 84°

**107**. 28 सेमी. व्यास असलेल्या धातूचा भरीव गोल वितळवून त्यापासून $4\frac{2}{3}$ सेमी. व्यास व 3 सेमी. उंची असलेले लहान शंकू तयार करण्यात आले, तर त्यापासून तयार झालेल्या शंकूंची संख्या किती असेल?


1) 672 2) 696
3) 525 4) 796

**108**. आकृतीत, चौरसाच्या आंतरवर्तुळाचा व्यास 14 सेमी. आहे, तर रेखांकित भागाचे क्षेत्रफळ चौ.से.मी. मध्ये काढा :




1) 91 2) 49
3) 91π 4) 49π

**109**. आकृतीत, जर $m\angle ABD = 30°$, $m\angle ADC = 70°$, $m\angle ACD = 25°$, तर बाजू AB, AD व AC यांच्या लांबीचा उतरता क्रम खालीलपैकी हा आहे:




1) AC > AB > AD 2) AB > AD > AC
3) AD > AC > AB 4) AC > AD > AB

**110**. आकृतीत, AB∥CD, जर $m\angle ABO = 40°$, $m\angle ODC = 35°$, तर x ची किंमत काढा :




1) 285° 2) 205°
3) 210° 4) 275°

**111**. समभुज चौकोन OABC चे उर्वरित तीन शिरोबिंदू A, B व C हे 'O' केंद्र असलेल्या वर्तुळावर आहेत. जर समभुज चौकोनाचे क्षेत्रफळ $32\sqrt{3}$ चौ.मी. असल्यास वर्तुळाची त्रिज्या काढा :

1) 64 मी. 2) 8 मी.
3) 4 मी. 4) 16 मी.

**112**. एका रक्कमेवर रू. 8 द.सा.द.शे. दराने 24 महिन्याकरिता होणाऱ्या चक्रवाढ व्याज व सरळ व्याज यातील फरक रू. 180 आहे, तर ती रक्कम किती ?

1) रू. 28,125 2) रू. 24,125
3) रू. 30,125 4) रू. 27,125

**113**. 72 लिटर दूध व पाण्याच्या मिश्रणामध्ये दूध व पाण्याचे प्रमाण 7 : 2 आहे. त्या मिश्रणामधील पाणी व दुधाचे प्रमाण 2 : 11 होण्याकरिता त्यात किती दूध मिळवावे लागेल ?

1) 16 लिटर 2) 40 लिटर
3) 20 लिटर 4) 32 लिटर


**114**. 6 ने भाग जाणाऱ्या पहिल्या n दोन अंकी नैसर्गिक संख्यांची बेरीज 1380 आहे, तर n ची किंमत किती ?

1) 18 2) 23
3) 20 4) 24

**115**. एका खोलीची लांबी, रूंदी व उंची यांची बेरीज 19 मी. आहे व तिच्या कर्णाची लांबी 11 मी. आहे, प्रती चौ.मी. ला रू.15 दराने त्या खोलीला फक्त आतून रंग देण्यासाठी येणारा खर्च किती ?

1) रू. 1,800 2) रू. 3,600
3) रू. 1,815 4) रू. 3,615


**116**. आकृतीत, रेख MN|| बाजू AC, Δ ABC मध्ये, बाजू MN त्रिकोणाला दोन समान क्षेत्रफळांच्या भागामध्ये विभागते, तर $\frac{AM}{AB}$ ची किंमत काढा :




1) $\frac{2}{1}$ 2) $\frac{1}{\sqrt{2}}$
3) $\frac{2-\sqrt{2}}{2}$ 4) $\frac{\sqrt{2}}{1-\sqrt{2}}$

Teachingninja.in

**117.**




आकृतीत दिलेल्या माहितीनुसार, x ची किंमत काढा :

1) 35°  2) 27.5°
3) 13.75°  4) 55°

**119.** तीनही शाळेतील मुलींची सरासरी संख्या किती ?

1) 3500  2) 3000
3) 2500  4) 3700


**120.** शाळा A व B मधील मुले व मुलींच्या संख्येतील फरक किती ?

1) 500  2) 300
3) 800  4) 1000

**118.** एक दोन अंकी संख्या त्या संख्येतील अंकांच्या बेरजेच्या पाच पटीपेक्षा 13 ने मोठी आहे. जर त्या संख्येच्या अंकाची अदलाबदल करून येणाऱ्या संख्येत 18 मिळविले, तर मूळ संख्या मिळते, तर मूळ संख्येच्या अंकाची बेरीज किती ?

1) 7  2) 9  3) 8  4) 6

तीन शाळेतील मुले व मुलींची संख्या(हजारात) जोडस्तंभालेखात दर्शविल्याप्रमाणे आहे. जोडस्तंभालेखाचे निरीक्षण करून खालील प्रश्न-क्रमांक **119** व **120** ची उत्तरे लिहा :




**121.** वस्तूची चाल ..........

1) धन किंवा शून्य असते परंतु ऋण नसते.
2) ऋण किंवा शून्य असते परंतु धन नसते.
3) धन किंवा ऋण असते परंतु शून्य नसते.
4) नेहमीच धन असते.

**122.** दूध .......... चे गुणधर्म दाखविते.

1) जेल (Gel)  2) पायस (Emulsion)
3) सोल (Sol)  4) एलरोसोल (Aerosol)

**123.** प्रकाश संश्लेषणातील कोणता टप्पा रेण्वीय ऑक्सिजन मुक्त करण्यास कारणीभूत असतो ?

1) अप्रकाशी अभिक्रिया  2) केल्व्हीन चक्र
3) हिल अभिक्रिया  4) क्रेब्स चक्र

**124.** R ओहम रोध असलेले तीन रोधक सुरवातीस समांतर जोडणीत जोडले आणि नंतर एकसर जोडणीत जोडले असता समांतर जोडणीतील एकूण रोध आणि एकसर जोडणीतील एकूण रोध यांचे गुणोत्तर .... असते.

1) $\frac{1}{3}$  2) $\frac{1}{6}$
3) $\frac{1}{9}$  4) 9

**125.** खालील मूलद्रव्यांच्या अणूमध्ये अनुक्रमे न्युट्रॉनची संख्या किती असेल ?

$^{23}_{11}Na$, $^{24}_{12}Mg$, $^{40}_{19}K$

1) 11, 12, 19  2) 23, 24, 40
3) 34, 36, 59  4) 12, 12, 21

Teachingninja.in

**126.** अयोग्य जोडी निवडा :

1) अनवीनीकरण स्रोत - कोळसा
2) टिहरी गावातील स्त्रिया - अपिको आंदोलन
3) भरपूर झाडांची लागवड - जंगलांचा विकास
4) लाल नोंदपुस्तिका - धोक्यात असलेल्या प्रजातींच्या नोंदी

**127.** शक्तीशाली विद्युतवाहक तारेतून विद्युत प्रवाह पश्चिमेकडून पूर्वेकडे जात आहे. पृथ्वीच्या चुंबकीय क्षेत्राचा प्रभाव विचारात न घेता, तारेच्या बरोबर खाली चुंबकीय क्षेत्राची दिशा ...... असेल.

1) उत्तरेकडे 2) दक्षिणेकडे
3) पूर्वेकडे 4) पश्चिमेकडे


**128.** खालीलपैकी कोणते अल्केन कक्ष तापमानाला द्रव रूपात असते ?

1) $C_3H_8$ 2) $C_{12}H_{26}$
3) $C_{20}H_{42}$ 4) $C_{48}H_{98}$

**129.** वातावरणात सोडल्या जाणाऱ्या मिथेन वायूचा प्रमुख स्रोत ....... होय.

1) भाताची शेती 2) ऊसाची शेती
3) गव्हाची शेती 4) चहाचे मळे

**130.** R Ω रोध असलेले तीन रोधक आकृतीत दाखविल्याप्रमाणे जोडले आहेत. A आणि B च्या दरम्यानचा परिणामी रोध ......... असेल.




1) $\frac{2R}{3}$ 2) $\frac{3R}{2}$
3) R 4) $\frac{3R}{4}$


**131.** खालीलपैकी कोणती प्रक्रिया रासायनिक अभिक्रियेचा वेग वाढविण्यास मदत करेल ?

1) तापमान कमी करणे
2) स्थायू रूप अभिक्रियाकारकांची भुकटी वापरणे
3) अभिक्रियेत बर्फ टाकणे
4) अभिक्रियाकारकांची सहंती कमी करणे

**132.** परिसंस्थामध्ये साधारणतः 10%ऊर्जा एका पोषणपातळीकडून पुढच्या पोषणपातळीकडे जाण्यास उपलब्ध असते. ती ऊर्जा .......... च्या स्वरूपात असते.

1) यांत्रिक ऊर्जा 2) प्रकाश ऊर्जा 3) उष्णता ऊर्जा 4) रासायनिक ऊर्जा

**133.** खालील आकृतीमध्ये चार वस्तूचा वेग काल आलेख दाखविलेला आहे. त्यापैकी कोणती वस्तू घटत्या त्वरणाने जात आहे ?




1) b 2) c
3) d 4) a


**134.** सोडियमचा अणुक्रमांक 11 आहे आणि अणुवस्तुमानांक 23 आहे, तर 1 ग्रॅम सोडियममध्ये सोडियमचे किती अणू असतील?

1) $6.022 \times 10^{23}$ 2) $1.204 \times 10^{24}$
3) $5.474 \times 10^{22}$ 4) $2.618 \times 10^{22}$

**135.** द्विबीजपत्री वनस्पतीतील पर्णछिद्रांच्या सुरक्षापेशीचा आकार कसा असतो ?

1) डंबेल (मुद्‌गल) 2) पिरॅमिड
3) वृक्क 4) शंकू

**136.** एक लाकडी ठोकळा आणि त्यावर ठेवलेले नाणे हे आकृतीत दाखविल्याप्रमाणे पाण्यावर तरंगत आहे, जर नाणे पाण्यात पडले तर.........




1) x वाढेल, y कमी होईल
2) x कमी होईल, y वाढेल
3) x आणि y दोन्ही कमी होतील
4) x आणि y दोन्ही वाढतील

**137.** 18 कॅरेटच्या 30 ग्रॅम सोन्यामध्ये शुध्द सोन्याचे वस्तुमान किती असेल ?

1) 22.5 ग्रॅम 2) 28.5 ग्रॅम
3) 26.0 ग्रॅम 4) 27.0 ग्रॅम

**138.** अधिभूमिक बीजांकुरणात भृणाच्या कोणत्या भागाचे दीर्घीकरण वेगाने होते ?

1) बीजपत्र 2) भृणपोष
3) उपरी बीजपत्र 4) अधोबीजपत्र

**139.** एक वस्तू सपाट आरशासमोर 1 मीटर अंतरावर ठेवली आहे, तर ती वस्तू आणि तिची प्रतिमा यातील अंतर .......... असेल.

1) 1 मीटर 2) 2 मीटर
3) 1.5 मीटर 4) 0.5 मीटर

**140.** $k_2CO_3$ हा .......... चा क्षार आहे.

1) सौम्य आम्ल आणि सौम्य अल्क
2) तीव्र आम्ल आणि तीव्र अल्क
3) तीव्र आम्ल आणि सौम्य अल्क
4) सौम्य आम्ल आणि तीव्र अल्क

Teachingninja.in

**141.** निवडक्षम परागालन (Ultrafiltration) ही प्रक्रिया वृक्काणूच्या कोणत्या भागात घडून येते ?

1) माल्फिघी काय  2) समीप संवालित नलिका
3) हेन्लेचा पाश  4) दूर संवलित नलिका

**142.** एका विशिष्ट माध्यमातून जाणाऱ्या तरंगाचा वेग 960 m/s आहे. माध्यमाच्या एका विशिष्ट बिंदूतून एका मिनीटात 3600 तरंग जात असतील, तर त्या तरंगाची तरंगलांबी ......... असेल.

1) 2 मीटर  2) 4 मीटर
3) 8 मीटर  4) 16 मीटर

**143.** अंकुरित परागकणातील कोणत्या पेशीपासून पुयुग्मकांची निर्मिती होते ?

1) नलिका पेशी  2) शाकीय पेशी
3) जनन छिद्रे  4) जनन पेशी

**144.** समुद्रसपाटीजवळ कोरड्या हवेतील शेकडाप्रमाणानुसार खालीलपैकी तिसऱ्या क्रमांकाचा मोठा घटक कोणता?

1) ऑक्सिजन  2) कार्बन डायऑक्साइड
3) अरगॉन  4) निऑन

**145.** एका वस्तूचे पृथ्वीच्या पृष्ठभागावरील वजन 100 N आहे. पृथ्वीच्या पृष्ठभागापासून R एवढ्या उंचीवर तिचे वजन ........ असेल. (R= पृथ्वीची त्रिज्या)

1) 25 N  2) 50 N
3) 12.5 N  4) 62.5 N

**146.** संक्रामक मूलद्रव्ये आणि त्यांचे ऑक्साइडस् औद्योगिक प्रक्रियांमध्ये ....... म्हणून वापरतात.

1) अपमार्जके  2) औषधे
3) उत्प्रेरके  4) कीटकनाशके

**147.** खाली दिलेल्या आकृतीमध्ये काही भाग वर्णानुक्रमे दर्शविले आहेत. भागाकरिता वापरलेला वर्ण आणि तो भाग यांची अचूक जोडी निवडा:



1) A -अध्यावरण, B- भृणकोष, C- बीजांडद्वार, D -निभाग
2) A -निभाग, B- अध्यावरण, C- भृणकोष, D- बिजांडद्वार
3) A -बिजांडद्वार, B -अध्यावरण, C -भृणकोष, D - निभाग
4) A - निभाग, B - बीजांडद्वार, C - भृणकोष, D - अध्यावरण

**148.** 1 किलोग्रॅम वस्तुमानाची वस्तू वरच्या दिशेने फेकली असता जास्तीत जास्त 10 मीटर उंचीवर जाते. या दरम्यान गुरुत्वीय बलाकडून झालेले कार्य ........ आहे.

1) 98 J  2) 49 J
3) -49 J  4) - 98 J

**149.** अणुभट्ट्यामध्ये जड पाण्याचा उपयोग कोणता ?

1) अणू विखंडन प्रक्रिया सुरु करणे
2) न्यूट्रॉनचे मंदायक म्हणून
3) किरणोत्सारी प्रदूषण कमी करण्यासाठी
4) अणू विखंडन प्रक्रिया थांबविण्यासाठी

**150.** खालीलपैकी कोणता कवकजन्य रोग पोल्ट्रीमधील पक्षांच्या सर्वाधिक मृत्यूस कारणीभूत आहे ?

1) कॅरिझा  2) पुलोरम
3) रिकेटस्  4) एस्परजिलॉसिस

## किंवा

## (प्रश्न-क्रमांक : 91 ते 150)

## भाग - C - सामाजिकशास्त्रे

**91.** आदिलशाहाने 'सरलष्कर' हा खिताब कोणाला दिला ?

1. मलिक अंबर  2. फतेहखान
3. शरिफजी  4. शहाजी राजे

**92.** चुकीची जोडी ओळखा :

1. मुरूंबदेव - राजगड  2. रायरी - रायगड
3. भोरप्या - प्रतापगड  4. रायरेश्वर - रोहिडा

**93.** योग्य जोड्या जुळवा :

| गट 'अ' | गट 'ब' |
|---|---|
| (अ) इरॅस्मस | (i) विचारवंत |
| (ब) फर्डिनंड मॅगेलन | (ii) खलाशी |
| (क) रॉजर बेकन | (iii) खगोलशास्त्रज्ञ |
| (ड) हॅले | (iv) धर्मसुधारक |

1. (अ) - (iv) (ब) - (ii) (क) - (i) (ड) - (iii)
2. (अ) - (iv) (ब) - (iii) (क) - (ii) (ड) - (i)
3. (अ) - (iii) (ब) - (iv) (क) - (i) (ड) - (ii)
4. (अ) - (ii) (ब) - (iii) (क) - (iv)(ड) - (i)

**94.** मीरत कट खटल्यात पुढीलपैकी कोणाला ब्रिटिश सरकारने अटक केली नव्हती ?

1. श्री.अ.डांगे  2. निंबकर
3. मुझफ्फर अहमद  4. राजेंद्र लाहिरी

**95.** भारतात हडप्पा संस्कृतीच्या वसाहतीत ....लिपीतील मजकूर असलेल्या विटा सापडल्या आहेत.

1. असिरियन  2. बॅबिलोनियन
3. मेसापोटेमियन  4. सुमेरियन

**96.** योग्य जोड्या जुळवा :

| गट 'अ' | गट 'ब' |
|---|---|
| (अ) रज्जुक | (i) तालुक्याचा अधिकारी |
| (ब) गोप | (i) खेड्याचा प्रमुख |
| (क) ग्रामणी | (i) जिल्ह्याचा अधिकारी |

1. (अ) - (iii) (ब) - (i) (क) - (ii)
2. (अ) - (iii) (ब) - (ii) (क) - (i)
3. (अ) - (ii) (ब) - (i) (क) - (iii)
4. (अ) - (ii) (ब) - (iii) (क) - (i)

Teachingninja.in

**97.** अकबर बादशाहाने निर्माण केलेली 'दीन-इ-इलाही' नवी व्यवस्था म्हणजे ..........
1. मानवतावाद, एकेश्वरवाद आणि विश्वबंधुत्व या तत्त्वांवर आधारित होती.
2. इस्लाम धर्मावर आधारित होती.
3. हिंदू धर्मावर आधारित होती.
4. ख्रिश्चन धर्मावर आधारित होती.

**98.** 'नायब वकील-ए-मुतलक' हा किताब ......... यांना मिळाला.
1. मल्हारराव होळकर 2. महादजी शिंदे
3. रघुजी भोसले 4. खंडेराव दाभाडे

**99.** खालीलपैकी अयोग्य जोडी ओळखा :
1. रॉबर्ट क्लाइव्ह - दुहेरी राज्यव्यवस्था
2. लॉर्ड कॉर्नवालिस - मुलकी नोकरशाहीची निर्मिती
3. लॉर्ड मेकॉले - राज्य खालसा धोरण
4. लॉर्ड बेंटिंग - सतीबंदीचा कायदा

**100.** एशियाटिक सोसायटीची स्थापना ......... शहरात झाली.
1. कोलकता 2. मुंबई
3. चेन्नई 4. नागपूर

**101.** गटात न बसणारे पद ओळखा :
1. कलमा 2. हदीस
3. नमाज 4. रोजा

**102.** खालीलपैकी कोणता शोध होल्डमॉन्टने लावला ?
1. शरीरातील रक्त हृदयापासून निघून रक्तवाहिन्यांद्वारे सर्व शरीरभर पसरते.
2. रसायनशास्त्र व औषधशास्त्र एकमेकांशी निगडित आहेत.
3. कार्बन-डाय-ऑक्साइड वायूचा शोध.
4. निसर्ग वैश्विक गुरुत्वाकर्षणाच्या सिध्दांतावर काम करतो.

**103.** पेट्रार्क, बोकॅशिओ, मॅकियाव्हेली हे ........ या देशाचे साहित्यिक होते.
1. इंग्लंड 2. फ्रान्स
3. इटली 4. जर्मनी

**104.** खालील घटना योग्य कालक्रमानुसार लावा :
(अ) कानागावा करार
(ब) कमोडोर पेरीचे येडो येथे आगमन
(क) जपानने कोरिया व फार्मोसा आपल्या अधिपत्याखाली आणले
(ड) मेइजी क्रांती
1. (ब), (अ), (ड), (क)
2. (अ), (ब), (क), (ड)
3. (ब), (ड), (क), (अ)
4. (अ), (क), (ड), (ब)

**105.** चुकीची जोडी ओळखा :
1. क्वाम नक्रूमा - घाना 2. जोमो केन्याटा - केनिया
3. रॉबर्ट मुगाबे - झिंबाब्वे 4. स्टॅन्ले - इंग्लंड

**106.** व्यापाराच्या वाढीसाठी चीनमधील युरोपीय व्यापाऱ्यांनी ... या नावाची व्यापारी संघटना स्थापन केली.
1. पेकिंग 2. कोहोंग
3. नानकिंग 4. मांचू

**107.** संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील खालील घटना योग्य कालाक्रमाने लावा :
(अ) अकोला करार (ब) फाजल अली कमिशन
(क) दार कमिशन (ड) नागपूर करार
1. (क), (अ), (ड), (ब)
2. (अ), (ब), (क), (ड)
3. (क), (ड), (अ), (ब)
4. (ब), (ड), (क), (अ)

**108.** सयाजीराव गायकवाड ........ चे शासक होते.
1. सातारा 2. सांगली
3. कोल्हापूर 4. बडोदा

**109.** पी.टी.आय., यू.एन.आय., समाचार भारती, हिंदुस्थान समाचार ...... आहेत.
1. वृत्तसंस्था 2. वृत्तपत्रे
3. वृत्तवाहिन्या 4. रेडिओ स्टेशन्स

**110.** भारतात शिलालेखांचा सर्वात मोठा संग्रह ........ येथे आहे.
1. म्हैसूर 2. नाशिक
3. मुंबई 4. दिल्ली

**111.** खालीलपैकी कोणती नागरी सुविधा देणारी संस्था नाही ?
1. अग्निशामक दल
2. प्राथमिक आरोग्य केंद्र
3. स्थानिक ग्राहक संरक्षण मंच
4. तांत्रिक शाळा

**112.** खालीलपैकी अयोग्य जोडी ओळखा :
1. लष्कराची छावणी - कटक मंडळ
2. तालुका पातळी - नगरपालिका
3. जिल्हा पातळी - जिल्हा परिषद
4. मोठी शहरे - महानगरपालिका

**113.** खालील जोड्यांमधील कोणत्या जोड्या स्थानिक कारभारातील आपला सहभाग दर्शवितात ?
(अ) नागरिकांची सनद - नागरिकांचे अधिकार
(ब) माहितीचा अधिकार - परिणामकारक सहभाग
(क) प्रसारमाध्यम - स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कारभाराचे मूल्यमापन
(ड) स्वयंसेवी संघटना - स्वावलंबनाची भावना

Teachingninja.in

1. (अ) व (ब)   2. (अ), (ब) व (क)
3. (अ), (ब) व (ड)   4. (अ), (ब), (क), (ड)

**114.** राष्ट्रपती पदासाठी निवडणूक लढविणाऱ्या व्यक्तीने वयाची …… वर्षे पूर्ण केलेली असावीत.
1. 21   2. 25
3. 30   4. 35

**115.** हे ………… या संयुक्त राष्ट्रांशी संलग्न संस्थेचे बोधचिन्ह आहे :



1. जागतिक आरोग्य संघटना
2. आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा आयोग
3. आंतरराष्ट्रीय कामगार संघटना
4. अन्न व शेती संघटना

**116.** भारताच्या सरनाम्यानुसार सत्तेचे उगमस्थान ……. हे आहे.
1. राष्ट्रपती   2. पंतप्रधान
3. संसद   4. भारतीय लोक

**117.** भारतीय संविधानाच्या सरनाम्यातील 'गणराज्य' या शब्दाचा अर्थ …….. हा आहे.
1. कोणतीही बाह्य सत्ता भारताच्या शासनावर नियंत्रण ठेवू शकत नाही.
2. मूलभूत नियमाच्या आधारे शासन व्यवहार केले जातात.
3. राज्यप्रमुख हा निवडून आलेला असतो. त्याला ते पद वंशपरंपरेने मिळत नाही.
4. कायद्यासमोर सर्वसमान असतात.

**118.** आंतरराष्ट्रीय न्यायालयाच्या न्यायाधीशांची निवड …….. करतात.
1. आमसभा   2. सुरक्षा परिषद
3. आमसभा व सुरक्षा परिषद   4. सरचिटणीस

**119.** महत्वाच्या सार्वजनिक प्रश्नावर लोकमत अजमावून निर्णय घेणे म्हणजे ………
1. प्रत्यावाहन   2. जनउपक्रम
3. सार्वमत   4. जनपृच्छा

**120.** अचूक पर्याय ओळखा :
आधुनिक काळात प्रत्यक्ष लोकशाही अस्तित्वात नाही, कारण…….
(अ) लोकसंख्येत वाढ झाली.
(ब) प्रदेशांचा विस्तार वाढला.
(क) सार्वजनिक प्रश्न गुंतागुंतीचे बनले.
1. (अ)   2. (ब)
3. (क)   4. वरीलपैकी सर्व पर्याय

**121.** केवळ पावसाच्या पाण्यावर केल्या जाणाऱ्या शेतीला …….. म्हणतात.
1. बागायती शेती   2. जिरायती शेती
3. सखोल शेती   4. व्यापारी शेती

**122.** यवतमाळ जिल्ह्यातील गरम पाण्याचा झरा असलेले प्रसिद्ध ठिकाण कोणते ?
1. वज्रेश्वरी   2. उन्हवरे
3. सुनपदेव   4. कापेश्वर

**123.** महाराष्ट्राचा राज्यपक्षी कोणता ?
1. हरियाल (हिरवे कबुतर)   2. पोपट
3. चिमणी   4. कावळा

**124.** गोव्यातील वैशिष्ट्यपूर्ण सांस्कृतिक उत्सव ……. आहे.
1. गणेशोत्सव   2. नवरात्र
3. कार्निव्हल   4. दिपावली

**125.** भारतात परतीचा मान्सूनचा काळ …….. असतो.
1. जून ते सप्टेंबर   2. ऑक्टोबर ते नोव्हेंबर
3. नोव्हेंबर ते जानेवारी   4. फेब्रुवारी ते जून

**126.** ग्रिनिच या मुळ रेखावृत्तावर गुरुवार दुपारचे 12 वाजले असल्यास 45° पश्चिम रेखावृत्तावर किती वाजले असतील ?
1. गुरुवार दुपारचे तीन   2. गुरुवार सकाळचे तीन
3. गुरुवार संध्याकाळचे सहा   4. गुरुवार सकाळचे नऊ

**127.** 23°30' ते 60°30' रेखावृत्त दरम्यानच्या प्रदेशास …….. पट्टा म्हणतात.
1. समशितोष्ण   2. उष्ण
3. शीत   4. उबदार

**128.** केंद्रभागातील जास्त दाबाकडून सभोवतालच्या कमी दाबाकडे चक्राकार दिशेत वाहणारे वारे …..
1. खारे   2. मतलई
3. प्रत्यावर्त   4. आवर्त

**129.** चंद्राचा पृथ्वीभोवती प्रदक्षिणा घालण्याचा मार्ग …….
1. गोलाकार   2. लंबवर्तुळाकार
3. उभ्या दिशेत   4. आडव्या दिशेत

**130.** मलेशिया व इंडोनेशिया यामध्ये असणारी सामुद्रधुनी ………..
1. पाल्क   2. जिब्राटर
3. मॅगेलनची   4. मलाक्काची

**131.** उष्ण आणि थंड प्रवाह जेथे एकत्र येतात त्या भागात ……… निर्माण होते.
1. दाट धुके   2. ढग
3. गारा   4. हिम

**132.** एखाद्या स्थानिक किंवा प्रादेशिक पातळीवरील वस्तू जागतिक पातळीवर उपलब्ध करून देणे म्हणजे ………
1. खाजगीकरण   2. उद्योगीकरण
3. जागतिकीकरण   4. स्थानिकीकरण

Teachingninja.in

**133**. इटलीच्या राजधानीचे शहर ..........
1. मिलान 2. रोम
3. व्हेनिस 4. नेपल्स

**134**. नकाशावरील समोच्यता रेषा जवळजवळ असल्यास जमिनीचा उतार ........
1. तीव्र उतार 2. सम उतार
3. मंद उतार 4. अंतर्वक्र उतार

**135**. ताडोबा व पेंच व्याघ्र प्रकल्प ........ आहे.
1. पश्चिम महाराष्ट्र 2. मध्य महाराष्ट्र
3. पश्चिम घाट 4. पूर्व महाराष्ट्र

**136**. लोकसंख्येच्या दृष्टीने भारतातील दुसऱ्या क्रमांकाचे राज्य........
1. केरळ 2. महाराष्ट्र
3. मध्य प्रदेश 4. गुजरात

**137**. सर्व प्रथम नकाशा तयार करणारे प्रसिद्ध भूगोलतज्ञ .............
1. विक्रम साराभाई 2. जगदीशचंद्र बोस
3. क्लाउडस् टॉलेमी 4. डॉ. माशेलकर

**138**. क्षेत्रफळाच्या दृष्टीने महाराष्ट्रातील सर्वात मोठा जिल्हा ...........
1. पुणे 2. सातारा
3. औरंगाबाद 4. अहमदनगर

**139**. ......... बेटे ही जलमग्न पर्वतरांगेची शिखरे आहेत.
1. निकोबार 2. लक्षद्वीप
3. मिनिकाय 4. अमिनदिवी

**140**. जगातील सर्वोच्च पर्वतरांग ...........
1. रॉकी पर्वत 2. ॲपेलेशिअन
3. हिमालय 4. अँडीज

**141**. भारतातील सर्वात मोठा लोकर उत्पादक प्रदेश .........
1. काश्मीर 2. राजस्थान
3. उत्तर प्रदेश 4. गुजरात

**142**. खतनिर्मितीसाठी उपयोगी पडणारा फॉस्फेट कोठे आढळतो ?
1. ललीतपूर 2. भरतपूर
3. नागपूर 4. इंदौर

**143**. आफ्रिकेतील सर्वोच्च शिखर .........
1. माऊंट केनिया 2. माऊंट रूवेनझोरी
3. मेरू 4. माऊंट किलीमांजारो

**144**. 'एल निनो' या स्पॅनिश शब्दाचा अर्थ .......
1. लहान मुलगी 2. लहान मुलगा
3. वृद्ध स्त्री 4. वृद्ध पुरुष

**145**. देवप्रयाग जवळ भागीरथी नदी कोणत्या नदीला मिळते ?
1. घागरा नदी 2. कोसी नदी
3. अलकनंदा 4. महानंदा


**146**. पोर्टोरिको गर्ता कोणत्या महासागरातील आहे ?
1. अटलांटिक 2. पॅसिफीक
3. हिंदी 4. आर्क्टिक्ट

**147**. गहू उत्पादनात जगातील प्रथम क्रमांकाचा देश ..........
1. भारत 2. संयुक्त संस्थाने
3. चीन 4. कॅनडा

**148**. थोरिअमचे मुख्य खनिज कोणते ?
1. ॲल्युमिनिअम 2. मोनाझाईट
3. युरेनिअम 4. अभ्रक

**149**. कोणत्या देशात महामार्गाला 'ऑटोरूटस्' म्हणतात ?
1. ग्रेटब्रिटन 2. जर्मनी
3. इटली 4. फ्रान्स

**150**. आकृतीतील उपकरणामधून निर्द्रव वायुदाबमापकाचा योग्य पर्याय ओळखा :



1. 2. 3. 4.

Teachingninja.in

## महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा दि. १४ डिसेंबर २०१४
## पेपर २ (माध्यम : मराठी) अंतिम उत्तरसूची -२३/०१/२०१५
## (व्दारा -महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे)

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. 4 | 31. 4 | 61. 3 | 91. 3 | 121. 1 | 91. 4 | 121. 2 |
| 2. 3 | 32. 2 | 62. 1 | 92. 1 | 122. 2 | 92. 4 | 122. 4 |
| 3. 2 | 33. 1 | 63. 2 | 93. 3 | 123. 3 | 93. 1 | 123. 1 |
| 4. 3 | 34. 4 | 64. 4 | 94. 2 | 124. 3 | 94. 4 | 124. 3 |
| 5. 3 | 35. 2 | 65. 4 | 95. 3 | 125. 4 | 95. 4 | 125. 2 |
| 6. 4 | 36. 1 | 66. 3 | 96. 2 | 126. 2 | 96. 1 | 126. 4 |
| 7. 3 | 37. 3 | 67. 2 | 97. 1 | 127. 1 | 97. 1 | 127. प्रश्नरद्द |
| 8. 1 | 38. 2 | 68. 4 | 98. 2 | 128. 2 | 98. 2 | 128. 3 |
| 9. 2 | 39. 4 | 69. 1 | 99. 3 | 129. 1 | 99. 3 | 129. 2 |
| 10. 3 | 40. 1 | 70. 4 | 100. 4 | 130. 1 | 100. 1 | 130. 4 |
| 11. 4 | 41. 3 | 71. 2 | 101. 2 | 131. 2 | 101. 2 | 131. 1 |
| 12. 3 | 42. 4 | 72. 3 | 102. 3 | 132. 4 | 102. 3 | 132. 3 |
| 13. 2 | 43. प्रश्नरद्द | 73. 2 | 103. 2 | 133. 2 | 103. 3 | 133. 2 |
| 14. 2 | 44. 2 | 74. 4 | 104. 3 | 134. 4 | 104. 1 | 134. 1 |
| 15. 4 | 45. 1,4 | 75. 2 | 105. 1 | 135. 3 | 105. 4 | 135. 4 |
| 16. 3 | 46. 3 | 76. 2 | 106. 2 | 136. 3 | 106. 2 | 136. 2 |
| 17. 2 | 47. 1 | 77. 1 | 107. 1 | 137. 1 | 107. 1 | 137. 3 |
| 18. 1 | 48. 4 | 78. 3 | 108. 1 | 138. 4 | 108. 4 | 138. 4 |
| 19. 4 | 49. 3 | 79. 3 | 109. 1 | 139. 2 | 109. 1 | 139. 1 |
| 20. 3 | 50. 1 | 80. 1 | 110. 1 | 140. 4 | 110. 1 | 140. 3 |
| 21. 2 | 51. 4 | 81. 4 | 111. 2 | 141. 1 | 111. 3 | 141. 2 |
| 22. 1 | 52. 3 | 82. 1 | 112. 1 | 142. 4 | 112. 2 | 142. 1 |
| 23. 4 | 53. 4 | 83. 3 | 113. 4 | 143. 4 | 113. 4 | 143. 4 |
| 24. 1 | 54. 2 | 84. 2 | 114. 3 | 144. 3 | 114. 4 | 144. 2 |
| 25. 1 | 55. 3 | 85. 3 | 115. 2 | 145. 1 | 115. 1 | 145. 3 |
| 26. 3 | 56. 1 | 86. 2 | 116. 3 | 146. 3 | 116. 4 | 146. 1 |
| 27. 3 | 57. 2 | 87. 4 | 117. 3 | 147. 2 | 117. 3 | 147. 3 |
| 28. 4 | 58. 2 | 88. 4 | 118. 3 | 148. 4 | 118. 3 | 148. 2 |
| 29. 3 | 59. 3 | 89. 2 | 119. 2 | 149. 2 | 119. 3 | 149. 4 |
| 30. 3 | 60. 4 | 90. 3 | 120. 1 | 150. 4 | 120. 4 | 150. 2 |

१) मराठी माध्यमाचा प्र.क्र. 43 छपाई चुकीमुळे रद्द करण्यात आला आहे. तसेच प्र.क्र. 127 प्रश्न चुकीमुळे रद्द करण्यात आला आहे. २) मराठी माध्यमामध्ये सा. शास्त्रे हा विषय घेतल्यास 148 प्रश्न बरोबर आहेत. तर गणित व विज्ञान विषय घेतल्यस 149 प्रश्न बरोबर आहेत. ३) मिळालेल्या टक्केवारीचे सूत्र : (विज्ञान व गणित असल्यास 149 मध्ये मिळालेले गुण गुणीले 100) भागीले 149 (सा.शास्त्रे असल्यास 148 मध्ये मिळालेले गुण गुणीले 100) भागीले 148

Teachingninja.in